# पनवेल महानगरपालिका

## वैदयकीय आरोग्य विभाग

कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल -४१०२०६.

**कोव्हिड-१९ साथरोग : :- : वैद्यकीय सेवा घेणेकामी थेट मुलाखती (Walk In Ineterview) :-** राज्यातील कोरोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्याच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेच्या रुग्णालयीन सेवेसाठी वाढीव मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे पदांवर निव्वळ तात्पुरत्या/अस्थायी स्वरुपात कंत्राटी पध्दतीने साथरोग कालावधीसाठी पात्र उमेदवारांची नेमणूक करणेकामी दि. ०८/०४/२०२१ ते २०/०५/२०२१ रोजी दुपारी या कालावधीत थेट मुलाखती आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

| अ. क्र | पद | शैक्षणीक अर्हता | पदांची संख्या | मासिक मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | MBBS | १० | रू.८०,०००/- |
| २ | वैद्यकीय अधिकारी | BAMS/BHMS/ BUMS | ४० | रू.५०,०००/- |
| ३ | अधिपरिचारीका | GNM/B.SC Nursing | २५ | रू.२५,०००/- |
| ४ | आरोग्य सेविका | H.S.C.आणि मान्याता प्राप्त संस्थेतील ऑक्झिलरी मिडवाईफ नर्सिंग कोर्स पुर्ण, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल नोंदणी आवश्यक | १५० | रू.२०,०००/- |
| ५ | फार्मासिस्ट | D. Pharma/B. Pharma | १५ | रू.२०,०००/- |
| ६ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | B.sc and DLMT | १५ | रू.२०,०००/- |
| ७ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | H.S.C. DMLT | १० | रू.१८,०००/- |

**अ.मुलाखतीचे ठिकाण- मा. आयुक्त महोदय यांचे कार्यालय, पनवेल महानगरपालिका** वैदयकीय आरोग्य विभाग कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल- ४१०२०६

**ब. इच्छुक व पात्र उमेदवारांनी त्यांचे अर्ज सोबत दिलेल्या विहित नमुन्यामध्ये मेलद्वारे शैक्षणिक अर्हतेच्या अनुभव प्रमाणपत्र स्कॅन कागदपत्रांसह** panvelcorporation@gmail.com या मेल आयडी वर पाठवावेत. सोबत मुलाखतीच्या दिवशीमूळ ओरिजनल कागदपत्रे छाननीसाठी घेवून येणे आवश्यक आहे. तसेच ०२२ - २७४५८०४०/४१/४२ या नंबरवर संपर्क करावा.

**अटी व शर्ती —**

१. उमेदवारांनी अर्जामध्ये संपूर्ण नाव, पत्रव्यवहाराचा पूर्ण स्पष्ट पत्ता, भ्रमणध्वनी/ दुरध्वनी क्रंमाक, मेल आयडी , जन्मतारीख, वय , धारण शैक्षणिक अर्हता, नोदंणी प्रमाणपत्र , अनुभव इत्यादी तपशिल कॉलमनिहाय स्पष्ट व स्वच्छ अक्षरात अथवा टंकलिखित स्वरुपातील अर्ज स्कॅन करून panvelcorporation@gmail.com या मेल आयडी वर पाठवावेत.

२. उमेदवारास नियुक्ती दिल्यास त्याने २४ तासात कामावर हजर होणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

३. सदरची नियुक्ती ही कंत्राटी पध्दतीने पूर्णपणे तात्पुरत्या / अस्थायी स्वरूपाची व कोव्हिड-१९ साथरोग कालावधीसाठी आहे. साथरोगाचा प्रादूर्भाव संपल्यानंतर त्यांची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल. त्यापुढे त्याना पनवेल महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याबाबत किंवा भविष्यात कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क राहणार नाही.

४. उपरोक्त पदांकरिता कालावधी ६ महिने किंवा कोरोना (कोव्हिड १९ ) चा प्रार्दुभाव संपेपर्यंत, जे आधी घडेल तो पर्यंत.

५. कोव्हिड केअर सेंटर, कोव्हिड रुग्णालय, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे तैनात राहुन सेवा देणे बंधनकारक राहिल. या अटीवर कंत्राटी स्वरुपात नेमणुक करण्यात येत आहे. कोणतीही अपवादात्मक परिस्थिती उभ्दवल्यास सादर पदावरील व्यक्तीची सेवा कोणतीही सुचना वा कोणतेही कारण न देता संपुष्टात आणली जाईल.

६. संशयास्पद सचोटी, गैरवर्तवणुक / अशोभनीय वर्तन, वरीष्ठाची दिशाभुल करणे, गैरहजर राहणे, आदेशाचे पालन न करणे याबाबत कोणतीही पुर्वसुचना न देता सेवा संपुष्टात आणली जाईल.

७. उमेदवाराला नियुक्तीनंतर राजीनामा द्यावयाचा असल्यास किमान १५ दिवसांची लेखी नोटीस द्यावी लागेल. अन्यथा त्या महिन्याचे मानधन अदा केले जाणार नाही.

८. उपरोक्त पदांकरिता दरमहा एकत्रित ठोक मानधन देण्यात येईल. पंदाची संख्या आवश्यकतेनुसार कमी किंवा जास्त करण्याचा अधिकार राखुन ठेवण्यात आला आहे.

९. क्षेत्रीयस्तरावर सामाजिक बांधिलकी ने काम करण्याची आवड असावी.

१०. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य राहिल. याबाबत आयुक्तांचा निर्णय अंतिम राहिल.

११. सदरची नेमणुक तात्पुरती असल्याने उमेदवारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुरुप करण्यात येणार आहे.

१२. वेळोवेळी लागू करण्यात येणाऱ्या इतर अटी/ शर्ती संबधितांना लागू राहतील. तसेच उमेदवाराचे काम समाधानकारक नसल्यास कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांची सेवा समाप्त करण्याचे अधिकार आयुक्त पनवेल महानगरपालिके यांना राहतील.

१३. सदर जाहीरातीतील पदसंख्या अथवा इतर बाबींमध्ये बदल करणे अथवा जाहिरीनुसार होणाऱ्या भरती प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा बदल करणे अथवा जाहिरातीनुसार होणारी भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार आयुक्त पनवेल महानगरपालिका यांना असतील.

08/04/2021

(सुधाकर देशमुख)
आयुक्त
पनवेल महानगरपालिका

Scanned by CamScanner